प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
ई-मेल/email : helpdoc@rbi.org.in

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, शहीद भगत सिंह मार्ग, फोर्ट, मुंबई-400001
**Department of Communication**, Central Office, Shahid Bhagat Singh Marg, Fort, Mumbai-400001 फोन/Phone: 022- 22660502

आज़ादी का अमृत महोत्सव

12 डिसेंबर 2022

**भारतीय रिजर्व बँकेने दि वैद्यनाथ को-ऑप बँक ली. बीड, महाराष्ट्र वर आर्थिक दंड ठोठावला**

भारतीय रिजर्व बँकेने दिनांक ५ डिसेंबर २०२२ रोजीच्या आदेशाद्वारे दि वैद्यनाथ को- ओप. बँक लि. बीड, महाराष्ट्र वर भारतीय रिझर्व बँकेच्या नागरी सहकारी बँकांसाठी तुमचा ग्राहक ओळखा (केवायसी) निर्देश, या संदर्भात जारी केलेल्या निर्देशांचे उल्लंघन / पालन न केल्याबद्दल ₹२.५० लाख (केवळ रुपये दोन लाख पन्नास हजार) चा आर्थिक दंड ठोठावला आहे. उपरोक्त निर्देशांचे पालन करण्यास बँक असमर्थ राहिली ही बाब लक्षात घेता बँकिंग नियमन कायदा, १९४९ च्या कलम ४७ ए (१) (सी) आणि सह वाचलेल्या ४६ (४) (i) व कलम ५६ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीनुसार भारतीय रिजर्व बँकेद्वारे आपल्या अधिकाराचा वापर करीत हा दंड ठोठावण्यात आला आहे.

ही कृती नियामक अनुपालनातील कमतरतांवर आधारित आहे आणि यामधे बँकेने तिच्या ग्राहकांसोबत केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या किंवा कराराच्या वैधतेवर प्रश्न चिन्ह उपस्थित करण्याचा हेतू नाही.

**पार्श्वभूमी**

३१ मार्च २०२१ रोजीच्या आर्थिक स्थितीवर आधारित बँकेच्या जोखीम मुल्यांकन अहवालात, इतर बाबींसह असे दिसून आले कि बँकेने भारतीय रिजर्व बँकेद्वारे जारी उपरोक्त निर्देशांचे उलंघन / पालन न करता (i) आपल्या ग्राहकांच्या केवायसी चे नियमित अद्यतन व (ii) नेमलेल्या कालक्रमानुसार सर्व खात्यांचे जोखीम प्रवर्गाचे पुनरावलोकन केले नाही. या संदर्भात बँकेला एक नोटीस पाठवण्यात आली होती ज्यात सदर अनुपालन न केल्याने दंड कां आकारण्यात येऊ नये याची कारणे द्यावी असे सुचविले होते.

या बाबतीत बँकेने दिलेले उत्तर, वैयक्तिक सुनावणीच्या वेळी बँकेने सादर केलेले तोंडी निवेदन विचारात घेता भारतीय रिजर्व बँक या निष्कर्षावर पोहोचली कि भारतीय रिजर्व बँकेच्या निर्देशांचे पालन न केल्याचे सिद्ध होते आणि आर्थिक दंड लावले जाने आवश्यक आहे.

**(योगेश दयाल)**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन: 2022-2023/1346**